RIGHT TO INFORMATION

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
(CIN. U40109MH2005SGS153646)
मानव संसाधन विभाग

पुण्यश्लोक 300

कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, अउदा संवसु विभाग, महापारेषण, 132/33 केव्ही उपकेंद्र, मानकापूर परीसर, कुणाल हॉस्पीटल समोर, छिंदवाडा रोड, मानकापूर, नागपूर – 440030.
मो. नं. 9175125256 Website : www.mahatransco.in
E-Mail:-1) ee4110@mahatransco.in 2) dymgrhr4110@mahatransco.in

संदर्भ क्र. :– काअ/अउदा/संवसु/विभाग/नाग/मासं/ 1570 दिनांक :– 17/7/26

# जाहीर सुचना

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री (Electrician) या व्यवसायात उत्तीर्ण उमेदवारांना सुचित करण्यात येते की, अउदा संवसू विभाग, महापारेषण, नागपूरच्या आस्थापनेवरील वर्ष २०२६-२७ करीता एक वर्ष कालावधीसाठी शिकाऊ उमेदवारीकरीता भरती प्रक्रीया राबवायची आहे. करीता पात्र उमेदवारांनी https://www.apprenticeshipindia.gov.in या संकेत स्थळावर शिकाऊ उमेदवारी करीता दि. २०.०७.२०२६ ते २७.०७.२०२६ च्या रात्री ११.५९ वाजेपर्यंत खालील नमुद आस्थापना नोंदणी क्रमांकावर ऑनलाईन अर्ज सादर करावे. आस्थापना नोंदणी क्रमांक व शिकाऊ उमेदवारी पदांचा तपशील खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | कार्यालयाचे नांव | आस्थापना नोंदणी (रजिस्टेशन) क्रमांक | विजतंत्री (Electrician) | कार्यक्षेत्र तथा एकूण जागा |
|---|---|---|---|---|
| १ | अउदा संवसू विभाग, म.रा.वि.पारेषण कं. मर्या. नागपूर | **E10162700629** | ४३ | अउदा संवसु विभाग, नागपूर अंतर्गत उपविभाग / उपकेंद्रे – ४३ |

१. **शैक्षणिक अर्हता :-**

   १ महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.

   २ राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात परीक्षा उत्तीर्ण.

२. **शैक्षणिक प्रमाणपत्रे/ कागदपत्रे** लागू असल्याप्रमाणेद्ध :- १. एस.एस.सी. व आय.टी.आय. विजतंत्री चार सेमिस्टरचे उत्तीर्ण गुणपत्रिकाची प्रत. २. शाळा सोडल्याचा दाखला ३. आधारकार्ड ४. मागासवर्गीय असल्याचे जात प्रमाणपत्र ५. महाराष्ट्र राज्याचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्र ६. प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र - नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र ; अजा, व अज या प्रवर्गातील उमेदवार वगळून ७. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) ८. सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टया मागास प्रवर्ग (SEBC)असल्याबाबतचे प्रमाणपत्र व इतर सर्व आवश्यक कागदपत्रांची मुळप्रत उमेदवारांने स्वतःच्या प्रोफाईलवर स्कॅन करून अपलोड करावे.

३. **विद्यावेतन:-** प्रचलित नियमाप्रमाणे लागु राहील.

४. नमुद पद संख्या कमी - अधिक करण्याचे व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले निर्णय घेण्याचे सर्व अधिकार व्यवस्थापन राखुन ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

५. भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-यांकडून दबाव आणल्यास, वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्या उमेदवारास भरती प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल./अपात्र ठरविण्यात येईल.

६. उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करताना पोर्टलवर आवश्यक मुळ प्रमाणपत्र स्कॅन करून योग्य रितीने अपलोड करणे बंधनकारक आहे. वरील कालावधील ऑनलाईन (Online) अर्ज सादर न केल्यास त्या नंतरच्या कालावधीत आलेल्या अर्जांचा विचार केल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

७. अपूर्ण, चुकीचे व अपु-या कागदपत्रासह सादर केलेले ऑनलाईन अर्ज स्विकारल्या जाणार नाही. अथवा त्यांचा विचार केल्या जाणार नाही. तसेच अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चूकीची अथवा खोटी आढळून आल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरेल.

८. एस.एस.सी. व आय.टी.आय. विजतंत्री गुणपत्रिकेवरील नाव आधार कार्ड मधील नावाशी सुसंगत असणे आवश्यक आहे, अन्यथा आपला अर्ज स्विकारला जाणार नाही.

९. वयोमर्यादा दि. ०१.०७.२०२६ रोजी १८ वर्षापेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथिल).

१०. ऑनलाईन (Online) अर्ज सादर करतांना उमेदवाराने सद्यस्थितीत कार्यान्वित E-Mail Id व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक राहील.

११. शिकाऊ उमेदवारांची निवड ही एस.एस.सी. व आय.टी.आय. परीक्षेचे मिळून एकूण प्राप्त गुणांच्या ५०% सरासरीच्या आधारे गुणवत्ते यादी नुसार तसेच सामाजिक आरक्षणाच्या अधिन राहुन प्रवर्गनिहाय केली जाईल.

१२. आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारांस या कार्यालयाने वेळोवेळी शासनाच्या नियमाप्रमाणे आरक्षणासंबधीत कागदपत्राची मागणी केल्यास ते सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

१३. प्रणाली मध्ये बदल झाल्यामुळे या आधी ज्या उमेदवारानी वरील आस्थापना नोंदणी/रजिस्टेशन क्रमांकावर ऑनलाईन (Online) अर्ज सादर केले असेल त्यांनी पुन्हा अर्ज सादर करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी. सदर भरती प्रकियेकरीता फक्त दि. २०.०७.२०२६ ते २७.०७.२०२७ दरम्यान ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचाच विचार केला जाईल. वर नमुद दिनांकाच्या पुर्वी किंवा नंतर ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचा भरती/निवड प्रकियेकरीता विचार केला जाणार नाही याची सुध्दा नोंद घ्यावी.

१४. ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर या जाहीरातीसह जोडलेला **प्रपत्र अ** परीपूर्ण भरून त्यासह ऑनलाईन सादर केलेल्या अर्जाची प्रत व मुद्दा क्र. ०२ मध्ये नमूद आवश्यक कागदपत्रे/ प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत/स्वसाक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती व इतर कागदपत्रे दि. २७.०७.२०२६ सायं. ०६:०० वाजे पर्यंत कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय अउदा संवसु विभाग, १३२ केव्ही उपकेंद्र, मानकापूर परिसर, कुणाल हॉस्पिटल समोर, कोराडी रोड, मानकापूर, नागपूर - ४४००३० या पत्त्यावर पोस्टाद्वारे किंवा स्वहस्ते पोहचेल या बेताने पाठवावे. तसेच सदर प्रपत्र आवश्यक कागदपत्र/ प्रमाणपत्रांसह विहीत मुदतीत प्राप्त न झाल्यास आपला अर्ज भरती/ निवड प्रक्रीयेसाठी विचारात घेतला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सहपत्र : प्रपत्र अ

(प्रशांत आर. खटी)
कार्यकारी अभियंता
अउदा संवसू विभाग,नागपूर

**प्रपत्र अ**

**म.रा. वि. पारेषण कंपनी मर्यादित अंतर्गत कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग नागपूर कार्यालयाच्या जाहिरातीनुसार करावयाचा अर्ज**

उमेदवाराचा अलीकडे काढलेला पासपोर्ट साईज फोटो चिकटवून त्यावर स्वाक्षरी करावी.

| | | |
|---|---|---|
| १ | उमेदवाराचे पुर्ण नाव | -------------------------------------------<br>(आडनाव) (उमेदवाराचे नाव) (वडीलांचे/पतीचे नाव) |
| २ | लिंग व वैवाहीक स्थिती (लागू असलेल्या ठिकाणी √ अशी खुण करावी) | (स्त्री) \| (पुरुष) \| (विवाहीत) \| (अविवाहीत) |
| ३ | उमेदवाराचा पत्रव्यवहाराचा पत्ता | -------------------------------------------<br>-------------------------------------------<br>------------------------- पिनकोड :- |
| ४ | उमेदवाराचा कायमचा पत्ता | -------------------------------------------<br>-------------------------------------------<br>------------------------- पिनकोड :- |
| ५ | दुरध्वनी /मोबाईल क्रमांक | |
| ६ | ई-मेल आयडी | |
| ७ | जन्म दिनांक (अंकामध्ये) | |
| ८ | जातीचा प्रवर्ग (लागू असलेल्या ठिकाणी √ अशी खुण करावी) | |

| अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | ईमाव | एसईबीसी | ईडब्लूएस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJA | NTB | NTC | NTD | SBC | OBC | SEBC | EWS | OPEN |
| | | | | | | | | | | |

**शैक्षणिक पात्रता (प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडाव्यात)**

| अ.क्र. | परिक्षेचे नाव | शाळा/मंडळ/विदयापीठ/संस्थेचे नाव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | परिक्षेतील एकूण गुण | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी. | | | | | |
| २ | आय.टी.आय.(विजतंत्री) | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |

**जोडावयाची आवश्यक प्रमाणपत्रे** (लागू असलेल्या ठिकाणी √ अशी खुण करावी)

| | | | |
|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी गुणपत्रिका | होय | नाही |
| २ | आय.टी.आय. गुणपत्रिका | होय | नाही |
| ३ | शाळा सोडल्याचा दाखला | होय | नाही |
| ४ | आधार कार्ड | होय | नाही |
| ५ | सक्षम अधिकारी यांनी दिलेले जात प्रमाणपत्र | होय | नाही |
| ६ | प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (Non creamy layer) (अनु जाती / अनु जमाती वगळून) | होय | नाही |
| ७ | सक्षम अधिकारी यांनी दिलेले अधिवास प्रमाणपत्र | होय | नाही |
| ८ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक उमेदवारांकरीता शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकारी यांनी दिलेले (EWS) प्रमाणपत्र. | होय | नाही |

**स्वघोषणापत्र**

मी ______________________________ म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित अंतर्गत

कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, नागपूर या कार्यालयाची शिकाऊ उमेदवार भरतीबाबतची प्रसारीत केलेली जाहीरात काळजीपूर्वक वाचली असून जाहीरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. दिलेल्या अर्जात भरलेली संपूर्ण माहिती खरी व योग्य आहे. सदर माहिती निवड प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यात चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास माझी उमेदवारी रद्द होईल याची मला जाणीव आहे. तसेच माझी निवड झाल्यास मी अउदा संवसु विभाग, नागपूर या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात कुठल्याही ठिकाणी रुजू होण्यास तयार आहे.

स्थळ :

दिनांक :

उमेदवाराची स्वाक्षरी